# डेलॉर्स आयोग : शिक्षणाचे चार आधारस्तंभ
# [Delors Commission : Four Pillers of Education]

**Shivaji Dattatraya Thore**
Ph.D., M.Phil., M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol), M.A.(Mar).,G.D.C. & A., B.Ed.(Gen),B.Ed.(Phy),
Arts, Science &Commerce Collage, Manmad Dist-Nashik (M.S)
Head-Dept. of Commerce, Guide-Savitribai Phule Pune University [Business Administration& Business Practices]

## 1) प्रास्ताविक : Introduction

जगाच्या स्पर्धेत टिकून यशस्वी होण्यासाठी उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमात योग्य ते बदल करणे काळाची गरज आहे. कारण शिक्षणातूनच सर्वच क्षेत्रात उंच उंच भरारी घेता येते. सर्वच क्षेत्रात होणारे बदल, वापरात येणारे तंत्रज्ञान, पर्यायी वस्तुचे उत्पादन, ग्राहकांच्या बदलणाऱ्या आवडी निवडी, जगातून आपल्या मालाला येणारी जास्त प्रमाणात मागणी, वस्तूचा दर्जा टिकविण्यासाठी उत्पादक कंपनीकडून केले जाणारे सदैव प्रयत्न, यासाठी सदैव दैनंदिन होणारे बदल, यांचे संशोधन करणे अतिशय महत्वाचे आहे. परकिय चलन प्राप्तीची संधी, राष्ट्रीय उत्पादनात वाढ यातून देशाचा विकास, रोजगार वाढ, बेकारी दूर होण्यास मदत, देशाचा सर्वांगीण विकास इ. अनेक विविध मार्गासाठी शिक्षणात नवीन बदल होणे काळाची गरज आहे.

## 2) उद्देश : [Objective]

1) डेलॉर्स आयोग पार्श्वभूमीचे अभ्यास करणे

2) शिक्षणाचे चार आधारस्तंभाचा अभ्यास करणे

   1) ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन

   2) कृतीसाठी अध्ययन

   3) सहजीवनासाठी अध्ययन

   4) अस्तित्वासाठी अध्ययन इ. चा अभ्यास करणे

## 3) गृहितके :

1) डेलॉर्स आयोगाचा अभ्यास करीत आहे.

2) शिक्षणाचे आधारस्तंभाचा अभ्यास होत आहे.

3) ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन अभ्यासात आहे.

4) कृतीतून अध्ययन होत आहे.

5) सहजीवनासाठी अध्ययन होत आहे.

6) अस्तित्वासाठी अध्ययन करीत आहे.

**4) पार्श्वभूमी :**

२१ व्या शतकाची चाहूल लागताच त्याबाबत विविध विचार, मत व्यक्त करण्यात येऊ लागले. २१ वे शतक विविध आव्हाने घेऊन अवतरले. या आव्हानांना पेलण्यासाठी शिक्षकांची भुमिका महत्वाची आहे. या शतकातील शिक्षण कसे असावे याबाबत अनेक तज्ञांचे विचार प्रवाहात येऊ लागले.

१९९३ मध्ये युनेस्कोने २१ व्या शतकातील शिक्षण कसे असावे याबाबत एका आयोगाची स्थापना केली. [UNESCO : Commission on Education for the Twenty First Century] या आयोगाचे अध्यक्ष म्हणून जेक्स् डेलॉर्स [Jacques L. Delors] यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांचा अहवाल १९९६ मध्ये प्रसिध्द केला. हा अहवाल 'Learning – The Treasure Within' या नावाने प्रसिध्द करण्यात आला. या अहवालाच्या चौथ्या परिशिष्ठामध्ये शिक्षणाचे चार आधारस्तंभ मांडण्यात आले. या स्तंभांनी भारतीय नव्हे तर वैश्विक (जागतिक) समाजास आधार देण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण कार्य केले आहे. या आयोगाच्या मते, २१ व्या शतकातील शिक्षण हे या चार आधारस्तंभांवर आधारित असावे, म्हणून या स्वरूपातून घेतलेले शिक्षण जगाच्या पाठीवरचे कोणतेही आव्हाने सहज पेलून मानव आनंदी व समाधानी जगू शकतो.

**5) शिक्षणाचे चार आधारस्तंभ : [Four Pillers of Education]**



वरील चारही आधारस्तंभ परस्परांमध्ये गुंफलेले असून, ते एकमेकांवाचून स्वतंत्र्य राहूच शकत नाही. या सर्व आधारस्तंभांविषयी डेलॉर्स यांचे विचार व या आधारस्तंभांचा स्विकार करण्यासाठी शिक्षणप्रक्रीया कशी असावी याबाबत विचार पुढीलप्रमाणे आहेत.

### 1) ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन [Learning to know]

२१ व्या शतकातील समाज हा ज्ञानधिष्ठीत समाज म्हणून ओळखला जातो. या ज्ञानधिष्ठीत समाजात ज्ञानप्राप्तीस अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. सततच्या होणाऱ्या नवनवीन संशोधनामुळे ज्ञानाच्या साठ्यात प्रचंड वाढ होत आहे. यातूनच ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे.

ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन म्हणजे ज्ञानप्राप्तीच्या साधनांचे आकलन होणे किंवा ज्ञानप्राप्तीचे मार्ग परिचित होणे. डेलॉर्स आयोगाने या स्तंभांच्या अंतर्गत पुढीलप्रमाणे आपले विचार मांडले आहेत.

#### 1) ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक कौशल्य व मार्गाचा परिचय :

डेलॉर्स च्या मते, २१ व्या शतकातील विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानप्राप्तीची कौशल्ये आणि मार्ग विकसित केले जावेत.




डेलॉर्स आयोगाने ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन व स्तंभांतर्गत वरील कौशल्ये आणि मार्ग विद्यार्थ्यांमध्ये विकसित करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. विद्यार्थ्यांमध्ये संप्रेषण कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. कारण ते ज्ञानप्राप्तीचे आणि ज्ञानदानाचे एक प्रभावी साधन आहे. २१ व्या शतकामध्ये नवनिर्मितीसाठी, संशोधनासाठी विज्ञान शिक्षणास या आयोगाने खूप महत्व

दिले आहे. शिक्षण आणि नोकरी यातील संबंधात फारकत करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणास महत्व देण्यात आले. यामुळे व्यावसायिक शिक्षणास प्राधान्य द्यावे असे डेलॉर्स यांनी सुचविले.

**2) ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन या स्तंभाची उद्दिष्ट्ये :**
**[Objectives of Learning to know]**

1) विद्यार्थ्यांना समाजात सन्मानाने जीवन जगण्यास मदत करणे
2) आपल्या परिसराचा परिचय करून देणे
3) अद्ययावत ज्ञान प्राप्त करून देणे
4) ज्ञानप्राप्तीद्वारे आनंद प्राप्त करणे
5) शोध घेण्यासाठी प्रेरित करणे
6) विषयातील सखोलता प्राप्त करून देणे
7) स्व-ज्ञानप्राप्तीतून राष्ट्रीय विकास साधणे इ.

**3) ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन या स्तंभाचे फायदे :**
**[Merits of Learning to Know]**

1) प्रत्येक व्यक्ती ज्ञानाचा कार्यकर्ता बनेल
2) ज्ञानलालसेची पूर्तता होईल
3) सतत ज्ञानप्राप्तीचा प्रयत्न केला जाईल
4) सर्व संधीचा लाभ घेता येईल
5) स्व-विकासाद्वारे राष्ट्रीय विकास साधता येईल इ.

**4) ज्ञानप्राप्तीसाठी अध्ययन स्तंभाचा स्विकार करताना निर्माण होणाऱ्या मर्यादा :**

1) सतत अद्ययावत ज्ञानप्राप्तीसाठी महत्व प्राप्त झाल्याने दोन पिढ्यांतील अंतर वाढेल
2) सर्वच प्रकारच्या ज्ञानप्राप्तीस महत्व असल्याने काही प्रसंगी सर्वच ज्ञानप्राप्ती नसल्यामुळे न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.
3) सर्वच बाबतीत ज्ञानप्राप्ती करताना 'Jack of All, Master of None' अशी अवस्था निर्माण होऊ शकते.

**2) कृतीसाठी अध्ययन : [Learning to Do]**

डेलॉर्स आयोगाने शिक्षणाचे आधारस्तंभ मांडतांना, कृतीसाठी अध्ययन हा दुसरा स्तंभ मांडला आहे. कृती करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य या दोन्हीचीही आवश्यकता असते, या आयोगाने कृतीसाठी अध्ययनाद्वारे पुढील बाबींना महत्व दिले आहे.




प्रत्येक व्यक्तीच्या अंगी क्षमता असतातच. या सुप्त क्षमतांचा विकास करण्यासाठी कृतीसाठी अध्ययन गरजेचे आहे. स्व-क्षमतांचा विकास झाल्याने व्यक्ती सतत काहीतरी नाविन्यनिर्मिती करण्याचा ध्यास धरेल. प्राप्त केलेल्या ज्ञानाची उपयोजनक्षमता व्यक्तींमध्ये निर्माण करायला हवी.

प्रत्यक्ष जीवनाची तयारी होण्यासाठी कृतीसाठी अध्ययन आवश्यक आहे. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत करायला हवा, त्याच्यामध्ये वैफल्य, न्युनगंड निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जावी, यासाठीच शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची प्रत्यक्ष तयारीच करून घेतली जावी.

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या किमान प्राथमिक गरजा भागविता याव्यात जीवन जगतांना त्यांच्या वैयक्तिक गरजा आहेत त्या भागविण्याची क्षमता शिक्षणात असावी, आज सर्वच क्षेत्रात प्रचंड गती असून त्याप्रमाणे समाजही गतीमय होत आहे. याप्रमाणे विद्यार्थ्यांना बदलता यावे अशी कौशल्य त्यांनी आत्मसात केली पाहिजे.

अशा प्रकारे डेलॉर्स यांनी कृतीसाठी अध्ययन या स्तंभांतर्गत शिक्षणाकडून अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

### 3) सहजीवनासाठी अध्ययन : [Learning to Live Together]

सहजीवनासाठी अध्ययन हा शिक्षणाच्या चार आधारस्तंभापैकी तिसरा महत्वाचा स्तंभ आहे. ॲरिस्टॉटल यांच्या पुढील ओळीवरून आपणांस या स्तंभाचे महत्व समजेल.

"Anyone can become angry, that is easy. But to be angry with the right person, to the right degree, to the right time, for right purpose & in right way, this is not easy."




२१ वे शतक हे स्पर्धेचे शतक म्हणूनही ओळखले जाते, स्पर्धेने मानवी जीवनातील सर्वच अंगांना स्पर्श केला आहे. आज गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरूष, शहरी -ग्रामीण या विविध घटकांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन सामाजिक दरी वाढत आहे. स्वार्थी दृष्टीकोन, त्यातून वाढणारी सामाजिक दरी यामुळे सामाजिक संघर्ष निर्माण होत आहे. जगातील बहुतांशी राष्ट्रांसमोरचा महत्वाचा प्रश्न म्हणजे दहशतवाद. सर्वच राष्ट्र दहशतवादाचे बळी पडत आहेत. आज सर्वांनाच असुरक्षितता अनुभवयास मिळत आहे. वाढत जाणाऱ्या विविध समस्या, आव्हाने यातून प्रत्येकाच्या मनात असुरक्षितता निर्माण होत आहे. प्रेम, आपुलकी, सहकार्य, संघभावना या मूल्यांची जागा आता स्वार्थी वृत्ती घेत आहे. वाढत जाणाऱ्या स्वार्थी वृत्तीमुळे सामाजिक आरोग्यही धोक्यात आले आहे. वरीलप्रमाणे सहजीवनासाठी अध्ययन याबाबत डेलॉर्स आयोगाने आपले विचार मांडले.

**4) अस्तित्वासाठी अध्ययन : [Learning to Be]**

डेलॉर्स आयोगाने मांडलेला शिक्षणाचा चौथा व शेवटचा स्तंभ म्हणजे अस्तित्वासाठी अध्ययन हा होय. ‘To be or not to be’ अशी अवस्था होऊ नये यासाठी प्रत्येकाला आपल्या अस्तित्वाचा शोध घेता यावा. डेलॉर्स आयोगाने या स्तंभाबाबत पुढील विचार मांडले आहेत.



डेलॉर्स आयोगाने गुणवत्तेला अधिक महत्व दिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये सर्वच बाबतीत गुणवत्ता निर्माण करण्यावरती त्यांनी भर दिला. ही गुणवत्ता आचार-विचारांच्या बाबतही असू शकते.

विद्यार्थ्यांना संपूर्ण व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठी शिक्षण देणे आवश्यक आहे. संपूर्ण व्यक्तिमत्व विकासामध्ये क्रियाशीलता, सर्जनशीलता, शारिरीक स्वास्थ्य, ज्ञानसंवर्धन, बौद्धिक विकास, वैचारीक विकास, व्यावहारिक कार्यक्षमता, सौंदर्याभिरूची, रसिकता, नैतिकता, आध्यात्मिकता व मानवता या सर्वांचा विकास अभिप्रेत असतो, याबरोबरच वर उल्लेखलेल्या जीवनातील सर्व पैलूचा विकास साधला जावा. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. याद्वारेच ते स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेतील, शाश्वत मूल्यांचा विकास साधतील.

## 6) समारोप :

डेलॉर्स यांनी आपल्या अहवालामध्ये संपूर्ण जगासाठी शिक्षणाचे जे चार आधारस्तंभ मांडले आहेत, त्यांनी नक्कीच २१ व्या शतकातील शिक्षणास आधार देण्याचे कार्य केले आहे. भारतीय समाजाच्या दृष्टीकोनातूनही यांचे महत्व अनन्यसाधारण आहे.

या आधारस्तंभांना अनुरूप जर शिक्षण प्रणालीमध्ये इष्ट बदल घडवून आणले आणि त्यानुसार त्यांची अंमलबजावणी घडवून आणली तर २०२० पर्यंत भारत एक महासत्ता बनणे कठीण होणार नाही. डेलॉर्स यांनी शिक्षणाबाबत मांडलेला विचार देशाच्या नव्हे जगाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. यात शंका नाही.

## 7) संदर्भसुची : [Bibliography]


1) अध्ययन व अध्यापन प्रा. गणेश चव्हाण (नित्य/नूतन प्रकाशन, पुणे)
2) आधुनिक शिक्षण प्रा. कुलकर्णी प्रगती प्रकाशन, पुणे
3) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र प्रगती प्रकाशन, पुणे
4) शैक्षणिक मूल्यमापन प्रगती प्रकाशन, पुणे
5) मराठी प्रथम व प्रादेशिक भाषा अध्यापक शिक्षक प्रगती, पुणे
6) मानसशास्त्राचा विकास आणि अध्ययन प्रगती प्रकाशन, पुणे
7) नागतोडे किरण नैतिक मूल्य शिक्षण
8) ठोंबरे विद्या – नितीमूल्य व शिक्षण नूतन प्रकाशन, पुणे
9) सहस्त्रबुदे विह शिक्षणातून नैतिक मूल्य संवर्धन साधना प्रकाशन, पुणे